# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा.
ता.कळमेश्वर, जि.नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

डॉ. लिलाधर डी. खरपुरिये
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

डॉ. धनंजय डब्ल्यु. देवते
रा.से.यो सह कार्यक्रम अधिकारी

डॉ. एम. व्ही. कोल्हे
प्राचार्य

**2016—2017**

➢ **सत्र १ जुलै २०१६**

**नामांकन  व स्वयंसेवक निवड प्रक्रिया**

**वृक्षरोपण**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे रा. से. यो. च्या वतीने दि. ०१ जुलै, २०१६ ला सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षरोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी याप्रसंगी प्रथम वृक्षरोपण करून कार्यक्रमाची सुरूवात केली. महाविद्यालयाच्या जेष्ठ प्राध्यपिका डॉ. आश्विनी खापरे, डॉ. संजय ठवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजीत जाचक, प्रा. विनोद भालेराव तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री संजयराव गणोरकर, श्री अजयराव अंजनकर, श्रीमती रजनी गणोरकर, श्री प्रदिप बगडे, श्री प्रकाश कोकोडे, श्री शुभम वाघ, श्री चेतन सुपले यांनी प्रत्येकी एका वृक्षाचे रोपण केले. यावेळी महाविद्यालयातील रा. से. यो. चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

स्वयंसेवकांनी या कार्यक्रमात मोठया उत्साहाने भाग घेवून संकल्प केला की, आम्ही वृक्षलागवडीसोबतच वृक्षाचे संगोपण व संरक्षण सुद्धा करू. तसेच वृक्षरोपणाविषयी जनजागृती करण्याचे प्रयत्न करू. महाविद्यालयात विविध जातीच्या एकूण ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच कर्मचारी व रा. से. यो. स्वयंसेवकांना प्रत्येकी एक वृक्ष देवून त्यांच्या संगोपणाची जबाबदारी देण्यात आली. सरते शेवटी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. डी. खरपुरीये व सहकार्यक्रम अधिकारी डॉ. डी. डब्ल्यू देवते. यांनी सर्वांचे आभार मानले. व स्वयंसेवकांना बिस्किट देवून कार्यक्रमाची सांगता झाली.





➢ **जागतिक लोकसंख्या दिवस**

**सोमवार दि. ११ जुलै २०१६**

जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये लोकसंख्या वाढ व परिणाम यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कोल्हे होते. त्यांनी

वाढती लोकसंख्या या चिंतनीय बाबीवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. धर खरपुरीये यांनी केले. तर सूत्र संचालन प्रा. विनोद भालेराव यांनी केले आभार सहकार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय देवते यांनी मानले.

कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर चहा, बिस्कीटे देवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




## ➢ शैक्षणिक सत्रातील रा.से.यो.उपक्रमांचा उद्‌घाटन सोहळा

सोमवार दि. ८ ऑगस्ट २०१६ ला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शैक्षणिक सत्र २०१६-२०१७ मधील विविध उपक्रमांचा शुभारंभ प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला रा.से.यो स्वयंसेवकांनी रा.से.यो गीत सादर केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपूरीये यांनी मागील सत्रातील संकल्प व अंमलबजावणी या विषयी माहिती दिली. चालू शैक्षणिक सत्रात नियोजित विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे यांनी अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयीन युवकात राष्ट्रसंतांचे विचार रूजविण्याचे महत्वाचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत होत आहे. नवराष्ट्र निर्मितीच्या या चळवळीत युवक युवतीचे सक्रीय योगदान देण्याची गरज आहे. तसेच विदर्भाच्या भूमित श्रमसंस्काराचा विचार खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी रूजविला. नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंतांचे व संत गाडगेबाबांचे विचार पुढे नेण्याचे कार्य सन १९७१ पासून राष्ट्रीय सेवा योजनेव्दारे होत आहे. श्रमसंस्कार, ग्रामस्वच्छता, शिस्त, ग्रामीण पूर्वनिर्माण व नेतृत्व गुणांचा विकास हीच राष्ट्रीय सेवा योजनेची वैशिष्टये आहे असे ते म्हणाले. डॉ. प्रमोद वडते यांनी विद्यापीठामध्ये आपल्या महाविद्यालयाने नावलौकिक मिळवावे असे आव्हान केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. ए. ए. खापरे, डॉ. ए. आर जाचक, प्रा. विनोद भालेराव, डॉ. ए. ए. थोडगे व शिक्षकेत्तर कर्मचारी

श्री.संजय गणोरकर उपस्थित होते. उद्घाटन सोहळयाचे संचालन प्रा. स्वप्नील चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार रा.से.यो. सहकार्यक्रम आधिकारी डॉ.धनंजय देवते यांनी मानले.

➢ **आठवडी शिबिर:-**

**१४ ऑगस्ट २०१६**

रविवार दि. १४ ऑगस्ट २०१६ रा.से.यो पथकाव्दारे महाविद्यालय परिसरात सकाळी ८.०० ते ११.०० दरम्यान स्वयंसेवकांनी परिसराचे साफसफाई अभियान राबविले तसेच रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या गाजर निर्मूलन करण्यात आले. स्वच्छता अभियान संपल्यानंतर सर्वांना चहा व अल्पोपहार देण्यात आला. या अभियानात स्वयंसेवकाची उपस्थिती वाखानण्याजोगी होती.





➢ **स्वातंत्र दिन**

**१५ ऑगस्ट २०१६**

सोमवार दि. १५ ऑगस्ट ला महाविद्यालयाचे ध्वजारोहण मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य् मा.तेजराजजी नाखले यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता करण्यात आले. याप्रसंगी मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य भाऊरावजी सुपले, प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे, रेखडे विद्यालय पिपळा (किनखेडे) चे माजी मुख्याध्यापक श्री. वा. पां. देवते, रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर डी. खरपुरिये, डॉ. अश्विनी खापरे, डॉ. संजय ठवळे, प्रा. डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, डॉ.धनंजय देवते व महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.संजय गणोरकर व इतर प्रामुख्याने उपस्थित होते आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना बिस्किटचे वाटप करण्यात आले. या स्वातंत्र दिनाच्या कार्यक्रमाकरिता रा.से.यो.स्वयंसेवक व कार्यक्रम आधिकारींनी अथक प्रयत्न केले.

- ## शिक्षक दिन

**५ सप्टेंबर २०१६**

सोमवार दि. ५ सप्टेंबर २०१६ ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रमोद वडते, प्रा. डॉ.अश्विनी ए. खापरे, प्रा. डॉ. अजित जाचक प्रा. विनोद भालेराव, डॉ.धनंजय देवते, डॉ.अल्का थोडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामधून रा.से.यो. कार्यक्रम आधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी शिक्षकदिनाचे महत्व विशद केले. याप्रसंगी डॉ. एल. डी. खरपुरीये यांचा सत्कार घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एम. व्ही.कोल्हे यांनी बदलत्या काळात शिक्षकांसमोरील आव्हाने या विषयावर आपले विचार विशद केले. प्रा. कु. सुविधा गहुकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वयंसेवीका कु. किर्ती कठाणे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता कु. डुलेश्वरी वैष्णव, कु. चित्रा काळे, रोशन मानमोडे, देवानंद खोब्रागडे, राहुल बन्सोड इत्यादी स्वयंसेवक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमानंतर स्वयंसेवकांना केळी, अल्पोहार आणि चहा देण्यात आला.




- ## वृक्षसंवर्धन दिन

**०६ सप्टेंबर २०१६**

गुरूवार दि. ०६ सप्टेंबर २०१६ ला प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर डी. खरपुरिये यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. महाविद्यालयाच्या परिसरात वेगवेगळया वृक्षाची रोपण करण्यात आले. प्रामुख्याने उपस्थित असलेले मराठी विभागाचे प्रमुख प्रा. विनोद भालेराव प्रा. डॉ. अश्विनी खापरे, प्रा. डॉ. संजय ठवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित

जाचक, डॉ. अलका थोडगे, रा.से.यो सहकार्यक्रम अधिकारी डॉ.धनंजय देवते व शिक्षकेतर कर्मचारी श्री.संजय गणोरकर व इतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या हस्ते वृक्षरोपन करण्यात आले.





- **आठवडी शिबिर**

  **रविवार दि. ११ सप्टेंबर २०१६**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मोहपा बस स्टॉप पासून तर महाविद्यालया पर्यंतचा परिसर साफ केला गेला. त्यामध्ये गाजर गवत निर्मूलन, प्लास्टीक कचरा एकत्र करणे, इत्यादी करिता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये ९० स्वयंसेविका व ४६ स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला होता. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. एल.डी. खरपुरिये व डॉ. डी. डब्ल्यु. देवते सोबतच मोहपा येथील नागरिकांनी सुध्दा या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घेतला.

नंतर स्वयंसेविकांना चहा बिस्किट व सफरचंद देण्यात आले.

- **राष्ट्रीय सेवा योजना दिन**

  **दि. २४ सप्टेंबर २०१६**

नुकताच स्थानिक बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून बॅरि. योरूाराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा येंशिल प्रा. डॉ. गजानन सोमकुंवर होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते.

प्रमुख्य वक्ताम्हणून डॉ. सोमकुंवर यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात श्रमप्रतिष्ठा, देशभक्ती, सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, सशक्त भारत निर्माण होण्याकरीता युवकांनी व्यसनमुक्त समाज निर्माण करावा व सर्वांगिण व्यक्तिमत्वाचा विकास हेच राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय आहे असे आपल्या मार्गदर्शनिय भाषनातून विचार विशद केले. डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवकांनी काम करीत

असताना तो मनापासून करायला पाहीजे, तेव्हाच त्या कामाचे योग्य फळ मिळते, कामाचे सोंग करू नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी समाज सेवेच्या कार्यात मोठया उत्साहाने भाग घ्यावा असे विचार मांडले. प्रमुख उपस्थिती श्रीमती डॉ. ए. ए. खापरे यांनीही याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. विनोद भालेराव यांनी, प्रास्ताविक डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. देवते यांनी केले.

कार्यक्रमाला प्रामुख्याने महाविद्यालयाचे डॉ. प्रमोद वडते, डॉ. अल्का थोडगे, प्रा. चव्हाण व खापरखेडयाचे शंकरराव बहादुरे व बहुसंख्योने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता श्री अंजनकर, श्री कोकोडे, श्रीमती अकर्ते यांनी परीश्रम घेतले.





- **आठवडी शिबिर**

**रविवार दि. २५ सप्टेंबर २०१६**

रासेयो पथकाव्दारे २५ सप्टेंबर २०१६ रोजी सकाळी ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा मोहपा येथे आठवडी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या परिसरामध्ये ८२ स्वयं सेवकांनी गाजर गवताचे व इतर साफसफाईचे काम पूर्ण केले. सकाळी ११ वाजता शाळेच्या प्रांगणात स्वयंसेवकांना एकत्र करून गीतगायनानीं शिबीराची सांगता झाली.





## ➢ जागतिक अहिंसा दिवस

### रविवार दि. २ ऑक्टोंबर २०१६

गांधी जयंती निमित्ताने जागतिक अहिंसा दिवसाचे औचित्य साधून रा.से.यो स्वयंसेवकांनी गावामध्ये शांतता रॅलीचे आयोजन केले. यामध्ये १२७ स्वयंसेवकांचा सहभाग होता. यानंतर महाविद्यालयामध्ये व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी केले. या प्रसंगी प्रा.डॉ. अश्विनी खापरे, प्रा.डॉ.संजय ठवळे, प्रा.डॉ.प्रमोद वडते, प्रा.डॉ.अजित जाचक इत्यादींची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.धनंजय देवते तर आभार प्रदर्शन प्रा. विनोद भालेराव यांनी मानले. चहा नाश्ता देवून समारोप केला.




## ➢ वाचन प्रेरणा दिवस

### दि. ९ ऑक्टोंबर २०१६

दि. ०९ ऑक्टोंबर २०१६ ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन करण्यात आले. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्हि. कोल्हे, राज्यशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. श्रीमती अश्विनी खापरे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, इंग्रजी विभागाचे प्रा.डॉ. अजित जाचक डॉ. प्रमोद वडते, डॉ.अलका थोडगे आदींनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले.

ग्रंथपाल डॉ. देवते यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथाचे महत्व पटवून दिले. वाचन, मनन, चिंतन यातूनच व्यक्तिच्या बुध्दीचा विकास होतो. बुध्दीप्रमाण्यवादातून अंधश्रध्दा, आळस यासारखे दुर्गुण दूर होतात. भारतातील साहित्याची ओळख करून घेण्याच्या उद्देशाने वाचन संस्कृती वाढीस लागली पाहिजे. एवढेच नव्हे तर, कोणते साहित्य वाचावे,

याचे देखील ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे विचार प्रा.डॉ. अजित जाचक यांनी व्यक्त केले. प्रा. विनोद भालेराव यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना अमुल्य मार्गदर्शन केले.

ग्रंथासारखा मित्र दुसरा कोणी असूच शकत नाही. चांगले ग्रंथ व्यक्तिला वास्तवाचे व जगण्याचे भान देत असतात. ग्रंथामुळेच समाजात चांगल्या नेतृत्वाचा उदय होत असतो. म्हणून प्रत्येकाने वाचनाचा छंद जोपासलाच पाहिजे, असे विचार प्रा.डॉ.अश्विनी खापरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एम.व्ही. कोल्हे यांनी प्रा.डॉ. अब्दुल कलाम यांचा जीवनपट शब्दबध्द करीत ‘वाचाल तर वाचाल’ या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्व अधोरेखित केले. याप्रसंगी डॉ. कलाम सरांच्या विविध पुस्तकांचे वाचनही विद्यार्थ्यांकडून करवून घेण्यात आले. रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा.लिलाधर खरपुरिये यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. प्रा.कु. सुविधा गहुकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयेजनासाठी संजय गणोरकर, प्रकाश कोकोडे, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, शुभम वाघ व चैतन्य सुपले यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

- **आठवडी शिबिर :-**

**रविवार दि. २३ आक्टोंबर २०१६**

रविवार दि २३ आक्टोंबर २०१६ रोजी सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत मोहगांव येथे ग्रामस्वच्छतेसाठी आठवडी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १३२ रा.से.यो स्वयेसंवकांनी सहभाग घेतला होता.

(मोहगांव सावंगी) येथील सरपंच श्री.ठाकरे यांनी स्वयंसेवकांचे आभार मानले. शेवटी चहा नाश्ता देवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

- **सरदार पटेल जयंती**

**दि. ३१.१०.२०१६**

दि. ३१.१०.२०१६ ला या महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्य दि. ३१ आक्टोंबर २०१६ ला राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते तर प्रमुख वक्ता म्हणून महाविद्यालयाच्या जेष्ठ प्राध्यापिका डॉ. ए. ए. खापरे उपस्थित होत्या. या प्रसंगी डॉ. कोल्हे आणि डॉ. खापरे यांनी सर्वांना उद्भोदन केले. त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वातंत्र लढयात बहुमोल कार्याचा आढावा घेवून त्यांचे देशाप्रती व देशाचे ऐक्य राखण्यासाठीचे असणारे विचार विषद केले.कार्यक्रमाला महाविद्यालयाचे डॉ. ठवळे, डॉ. वडते, डॉ. जाचक,

प्रा. भालेराव, डॉ. खरपुरीये, डॉ. थोडगे, श्री संजय गणोरकर, शुभम वाघ, ए. पी.अंजनकर, चेतन सुपले, प्रदिप बगडे, प्रकाश कोकोडे, श्रीमती गणोरकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी सर्वानी राष्ट्रीय ऐक्यासाठी खालिल शपथ घेतली.

**राष्ट्रीय एकता दिवस शपथ**

मै सत्यनिष्ठा से शपथ लेता हूँ कि मै राष्ट्र की एकता, अखंडता और सुरक्षा को बनाए रखने के लिए स्वयं को समर्पित करूंगा और अपने देशवासियों के बीच यह संदेश फैलाने का भी भरसक प्रयत्न करूंगा द्य मै यह शपथ अपने देश की एकता की भावना से ले रहा हूँ जिसे सरदार वल्लभभाई पटेल की दूरदर्शिता एवं कार्यो द्वारा संभव बनाया जा सके द्य मै अपने देश की आंतरिक सुरक्षा सुनिश्चित करने के लिए अपना योगदान करने का भी सत्यनिष्ठा से संकल्प करता हूँ द्य

आभार प्रदर्शन डॉ. धनंजय देवते यांनी केले.

- **संविधान दिन**

**दि. २६ नोव्हेंबर २०१६**

मोहपा एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालयात २६ नोव्हेंबर, २०१६ रोजी संविधान दिनानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

भारताच्या संविधानाबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी. संविधानामुळे भारतात शासकीय, न्यायीक व्यवस्था निर्माण झाल्या, अशा संविधानाची ओळख सर्वांना व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॅा. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यक्रमाचे आयोजन केले. कोणत्याही देशाचे संविधान त्या देशाच्या सामाजिक रूढी, परंपरा व प्रथा आदींची एक चौकट असते. या चौकटीतून देशाच्या एकूण परिस्थितीचे प्रतिबिंब उमटते, असे मत प्राचार्य डॅा. कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॅा. अश्विनी खापरे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेतल्यानंतर या उद्देशपत्रिकेतील मुलभूत तत्वांचा अर्थ स्पष्ट केला. २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी भारताचे संविधान जनतेला अर्पण करण्यात आले. जगातील सर्वांत मोठी आणि बळकट लोकशाही व्यवस्था भारतात आहे. म्हणून प्रत्येक सुजाण नागरिकाने भारताच्या संविधानाची किमान उद्देशिकातरी समजून घेणे गरजेचे आहे, असे विचार त्यांनी व्यक्त केले. संविधान निर्मितीचा इतिहास उलगडत संविधान दिनाचे औचित्य रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॅा. खरपुरिये यांनी विशद केले.

कु. शितेश्वरी बडवाईक हिने कार्यक्रमाचे संचालन केले. सुविधा गहुकर हिने आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची भरगच्च उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॅा. प्रमोद वडते, प्रा.

डॉ. अल्का थोडगे, प्रा. स्वप्निल चव्हाण यांचेसह सर्व अधिव्याख्याता आणि संजय गणोरकर, रजनी अकर्ते, अजय अंजनकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले आदी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

- **जागतीक एड्स विरोधी दिवस**

  **दि. १ डिसेंबर २०१६**

गुरूवार दि. १ डिसेंबर २०१६ ला महाविद्यालयात रा.से.यो विभागतर्फे जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्हे होते. प्रमुख पाहुण्या डॉ.आश्विनी खापरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.खापरे यांनी एड्स म्हणजे काय? त्याचा प्रादुर्भाव कसा होतो? त्याला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना आहेत यावर विद्यार्थ्यासोबत चर्चा करण्यात आली. रा.से.यो. स्वयंसेवकांनी यावर प्रश्नसुध्दा उपस्थित केले.

रा.से.यो अधिकारी प्रा.लिलाधर खरपुरिये यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी डॉ.वडते, डॉ. जाचक, प्रा.विनोद भालेराव, डॉ.अलका थोडगे, व रा.से.यो सहकार्यक्रम अधिकारी, डॉ.देवते व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.सूत्रसंचालन कु.शितेश्वरी बडवाईक यांनी केले तर प्रा.स्वप्नील चव्हाण यांनी आभार मानले.

- **आठवडी शिबिर**

  **रविवार दि. ११ डिसेंबर २०१६**

रविवार दि.११ डिसेंबर २०१६ ला रा.से.यो. विभागातर्फे मोहपा येथील इंदिरा गांधी वसाहत वार्ड नं. ३ मध्ये साफसफाईचे काम करण्यात आले. तेथील नाल्यावर रस्ते साफ करण्यात आले. नगरसेवकांनी रा.से.योच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व भविष्यात आदर्श नागरिक म्हणून नावलौकिक कराल असा विद्यार्थ्याच्या संदर्भात आशावाद व्यक्त केला. या शिबीरात १४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रम अधिकारी प्रा. लिलाधर खरपुरिये यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

## ➢ सुशासन दिन

**दि. २५ डिसेंबर २०१६**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे दि. २५ डिसेंबर २०१६ रोजी श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. व्ही. कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून सुशासनाचा पैलू उलगडून दाखविला. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. रा.सेयो. कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. डी. खरपुरिये यांनी सर्वांचे आभार मानले.

## ➢ आठवडी शिबिर

**रविवार दि. ०१ जानेवारी २०१७**

रविवार दि. ०१ जानेवारी २०१७ ला रा.से.यो विभागातर्फे संवद्री या गावामध्ये जावून गावातील रस्त्यांची साफसफाई केली. त्यामध्ये १३० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. सवंद्री येथील सरपंचांनी रा.से.यो च्या विद्यार्थ्यांची प्रशंसा करून चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली.






## ➢ स्वच्छ भारत पंधरवाडा

**दि. ०२ जानेवारी ते १६ जानेवारी, २०१७**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०२ जानेवारी २०१७ ते १६ जानेवार, २०१७ पर्यंत महाविद्यालयाच्यावतीने स्वच्छ भारत पंधरवाडा साजरा करण्यात आला. या पंधरवाडयात रा.से. यो. पथकाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचे पडीत, गाजरगवत, बाभूळ व काडीकचरा व दगडांनी भरून पडलेल्या मैदानाची स्वच्छता केली. आज हे मैदान विद्यार्थांना खेळण्यायोग्य झाले आहे. आता या मैदानावर महाविद्यालयीन स्तरावरच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच महाविद्यालयाच्या

सभोवतालच्या मुख्य रस्त्यांवरील गाजरगवत कापून  रोडची दोन्ही बाजू स्वच्छ करण्यात आली आहे. तसेच महाविद्यालयाच्या मागच्या बाजूला असलेला मोहपा नगरपालीकेचा डंपींग यार्डच्या रोडची सुद्धा साफ सफाई करण्यात आली आहे. या स्वच्छता अभियानाकरिता रा.से.यो. स्वयंसेवकांनी खुप मोठे परिश्रम घेतले आहे. या कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी स्वयंसेवकांना नेहमी प्रोत्साहीत केले. ते नेहमी म्हणायचे की,'कामाची किंमत होते, कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते'. म्हणून  स्वयंसेवक  हा स्वता:साठी नाही तर  समाजासाठी झटत असतो. तेव्हा विद्यार्थांनी अशी कामे करायलाच पाहीजे. तसेच स्वच्छ भारत पंधरवाडा या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. डॉ.ए.ए. खापरे, डॉ. ठवळे, डॉ. वडते, डॉ. जाचक, प्रा. भालेराव,डॉ. थोडगे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. संजय गणोरकर, श्री. अजय अंजनकर, श्री प्रदीप बगडे, श्री प्रकाश काकोडे, सौ.  रजनी  अकर्ते , शुभम वाघ, चैतन्य सुपले या सर्वांनी सहकार्य केले. रा. से यो. कार्यक्रम अधिकारी  डॉ.  लिलाधर खरपुरीये  व सहकार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय देवते यांनी  अथक परिश्रम घेतले.





- **राष्ट्रीय युवा दिन**

  **दि. १२ जानेवारी २०१६**

महाविद्यालयात दि. १२ जानेवारी ला स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय युवादिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे होते. तर प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ.अश्विनी खापरे हया होत्या. प्रमुख वक्ते डॉ.अजित जाचक व प्रा.विनोद भालेराव होते. सर्वच पाहुण्यांनी स्वामी विवेकानंदाच्या विचारांची जगाला गरज आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एम. व्हि. कोल्हे यांनी विवेकानंदांचे हिंदु संस्कृति व मानवतेविषयी विचार यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. लिलाधर खरपुरिये यांनी केले. याप्रसंगी प्रा.डॉ.प्रमोद वडते, डॉ.अलका थोडगे, प्रा. अनिता गणोरकर व शिक्षेकेतर कर्मचारी श्री.संजय गणोरकर, हरिश अंजनकर, प्रदिप बगडे, प्रकाश कोकोडे, रजनी गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. सचिन काळे यांनी केले. तर आभार डॉ.धनंजय देवते यांनी मानले. या कार्यक्रमाला बहुसंख्या विद्यार्थी उपस्थित होते.




- **आठवडी शिबिर**

  **रविवार दि १५ जानेवारी २०१७**

रविवार दि. १५ जानेवरी २०१७ ला मोहपा नगर परिषद राजीव गांधी क्रीडा संकुल परिसर गाजर गवताने वेढलेला होता. प्रजासत्ताक दिन या ठिकाणी उत्साहात साजरा होत असतो. मोहपा येथील सर्व शाळा प्रजासत्ता दिनानिमित्त येथे एकत्र सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करतात. रा.से.यो. स्वयंसेवकांनी संपूर्ण क्रीडा संकुल साफ केले. नगर परिषदेचे शिक्षक सभापती नगरसेवक यांनी रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांचे गोडकौतुक केले. त्यानंतर चहा व बिस्किटं देण्यात आले.

- **आठवडी शिबिर**

  **सोमवार दि. २५ जानेवारी २०१६**

दि. २६ जानेवारी महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन म्हणून नेहमी मोठया उत्साहात संपन्न होत असतो. त्यामुळे महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे, पताका बांधणे, रांगोळी काढणे, इत्यादी कामे रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी केली. या कामात १२५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

- **प्रजासत्ताक दिन**

  **दि. २६ जानेवारी २०१७**

गुरूवार दि. २६ जानेवारी २०१७ ला मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य श्री.तेजरामजी नाखले यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता ध्वजारोहण झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे तसेच रेखडे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री.वा.पा. देवते, श्री.भाऊरावजी सुपले, व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये बिस्किटचे वाटप करण्यात आले.

- **आठवडी शिबिर**

**रविवार दि. ५ फेब्रुवारी २०१७**

रविवार दि. ५ फेब्रुवारी २०१७ आठवडी शिबिराचा शेवट असल्यामुळे रा.से.यो. विभागातर्फे महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान करून वार्षिक रा.से.यो. शिबिराची सांगता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रा.डॉ. प्रमोद वडते यांनी स्वयंसेवकांनी वर्षभरात केलेल्या कामाची प्रशंसा केली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्हे यांनी रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द राहून अतिशय योग्यरित्या काम केल्याबद्दल कौतुक केले.

याप्रसंगी उपस्थित असलेले प्रा.डॉ. खापरे, प्रा.डॉ. ठवळे, प्रा.डॉ.वडते, प्रा.डॉ. जाचक, डॉ. देवते, प्रा. भालेराव, डॉ.थोडगे. प्रा.चव्हाण, प्रा.कु. गहुकर, श्री.संजय गणोरकर, प्रदीप बगडे हरिष अंजनकर यांचे रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा.लिलाधर खरपुरिये यांनी आभार मानले.

- **सिकलसेल तपासणी कार्यक्रम**

**दि. १२ फेब्रुवारी २०१७**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत येथील प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या वतीने या आजाराबाबत समुपदेशन व तपासणी कार्यक्रमाचे आयोजन दिनांक **१२. ०२.२०१७** ला **सकाळी ९.३० वाजता** करण्यात आले. केन्द्राचे सिकलसेल संशोधक गुणवंत नेहारे यांनी या आजाराबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले. ८८ विद्यार्थ्यांची यावेळी तपासणी करण्यात आली. पॉझिटीव्ह आढळलेल्या २ विद्यार्थ्यांच्या रक्ताचे नमूने पुढील कार्यवाहीस्तव कळमेश्वरच्या ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता उके आणि डॉ. खेडेकर यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमात सिकलसेल पर्यवेक्षक विजय सोनारे, पुण्यवान पुरी, आरोग्य सहायक एन. बी. श्रीखंडे, आर. डी. बैगने, आरोग्यसेवक यु. एस. गोमासे, प्रीती आंबुलकर यांचेसह महाविद्यालयाचे प्राचार्य एम. व्ही. कोल्हे, प्रा. डॉ. अश्विनी खापरे, प्रा. डॉ. प्रमोद वडते, प्रा. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, प्रा. डॉ. लिलाधर खरपुरिये, प्रा. डॉ. अल्का थोडगे, कु. सविधा गहुकर आणि संजय गणोरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रा. से. यो. स्वयंसेवक आणि शुभम वाघ, चैतन्य सुपले, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे व प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले.




- ## डिजिटल साक्षरता अभियान

### दि. २४ फेब्रुवारी २०१७

दि. २४ फेब्रुवारी २०१७ ला संत गाडगे बाबा जयंती व डिजिटल साक्षरता अभियान हा संयुक्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते. तर प्रमुख वक्ते श्री राजकुमार चंद्रा, व्यवस्थापक, युको बॅंक, मोहपा हे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनिय भाषणात डिजिटल साक्षरता काळाची गरज आहे. म्हणून जास्तीत जास्त लोकांनी कॅशलेस व्यवहार करावे. याकरीता नेटबॅकींग, एटीएम, क्रेडीट कार्ड, पेटीएम यासारख्या साधनांचा वापर करावा. या साधनांच्या वापरामुळे काळा पैसा, भ्रष्टाचार व आतंकवादाला नियंत्रित करता येते, असे त्यांनी सांगतिले. प्राचार्य डॉ. एम. व्ही कोल्हे यांनी संत गाडगे बाबा यांचा जीवनपट उलगडविला. तसेच कॅशलेस व्यवहार: काळाची गरज यावर मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. एल. डी. खरपुरीये यांनी केले. प्रास्ताविकामधून त्यांनी नोटबंदीमूळे निर्माण झालेली नोटटंचाई वर उपाय, नेटबॅकींग व्यवस्था हीच आहे, असे मत विशद केले. याप्रसंगी कार्यक्रमाला प्रामुख्याने डॉ. ए. ए. खापरे, डॉ. एस. जी. ठवळे, डॉ. पी. ए. वडते, डॉ. ए. आर. जाचक, प्रा. ए. ए. थोडगे, प्रा. स्वप्नील चव्हाण, प्रा. सुविधा गहूकर व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री गणोरकर, श्री अंजनकर, श्री बगडे, श्री वाघ, श्री सुपले, श्री कोकोडे, श्रीमती गणोरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. विनोद भालेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी डॉ. डी. डब्ल्यू देवते यांनी केले.

 

प्रा. लिलाधर डी. खरपुरिये

रा.से.यो कार्यक्रम अधिकारी

डॉ. एम. व्ही कोल्हे

प्राचार्य

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा